सन २०१८-१९ पासून टप्या-टप्याने राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटांची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत......

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१७/प्र.क्र. ६७/पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना-

मा. मंत्री (वित्त) यांच्या २०१७ च्या अर्थसंकल्पिय भाषणात **"परसातील कुक्कुट पालनास प्रोत्साहन देत ही प्रक्रिया रोजगारक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर सघन कुक्कुट विकास गटांची स्थापना करण्यास येणार आहे."** अशी घोषणा केलेली आहे.

त्या अनुषंगाने, राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटांची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. दि.१.११.२०१७ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटाची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुषंगाने, खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेले शासकीय सघन कुक्कुट विकास प्रकल्प, ४ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे, १ बदक पैदास केंद्र आणि १४ जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी तत्वावर स्थापित होणारे सघन कुक्कुट विकास प्रकल्पांचे तालुके वगळून, राज्यातील उर्वरीत ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटांची (Intensive Poultry Development Blocks) सन २०१८-१९ पासून टप्या-टप्याने स्थापना करण्यास याद्वारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, या योजनेअंतर्गत स्थान निश्चिती व लाभार्थ्यांची निवड ही प्रक्रिया सन २०१७-१८ पासून सुरू करण्यात यावी.

प्रकल्पांतर्गत विविध घटक व आर्थिक निकष:-

या प्रकल्पाचे विविध घटक खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	तपशील	शासन / लाभार्थी सहभाग	एकूण अंदाजित किंमत
१	जमीन-२५०० चौ. फूट (१००० चौ. फूटचे २ शेड), खाद्य, अंडी साठवणूक व अंडी उबवणूक यंत्र ठेवण्यासाठी स्वतंत्र खोल्या	जमीन व खोल्या लाभार्थीच्या स्वत:च्या मालकीच्या असतील	निरंक

२	प्रति १००० चौ. फूटाच्या २ पक्षीगृहाचे बांधकाम, स्टोअर रूम, पाण्याची टाकी, विद्युतीकरण	शासन + लाभार्थी	रू. ४,००,०००/-
३	खाद्य व पाण्याची भांडी, ब्रुडर, इतर उपकरणे व लसीकरण	शासन + लाभार्थी	रू. ५०,०००/-
४	लघु अंडी उबवणूक यंत्र (Mini Setter cum Hatcher)	शासन + लाभार्थी	रू. १,८०,०००/-
५	१००० एकदिवसीय मिश्र (नर +मादी) पिले प्रति पक्षी रू. ६०/-	शासन + लाभार्थी	रू. ६०,०००/-
६	२० आठवड्याचे अंड्यावरील ५०० पक्षी (नर+ मादी) प्रति पक्षी रू. १५०/-	शासन + लाभार्थी	रू. ७५,०००/-
७	उबवणूकीची अंडी ४०० प्रति अंडी रू. १०/-	शासन + लाभार्थी	रू. ४,०००/-
८	१००० एकदिवसीय पिलांसाठी २० आठवडे कालावधी पर्यंत पक्षी खाद्य पुरवठा (प्रति पक्षी एकूण ८.५० किग्रॅ खाद्य प्रति किलो रू. २५ /- दराने)	शासन + लाभार्थी	रू. २,१२,५००/-
९	एग नेस्ट्स	शासन + लाभार्थी	रू. ३०,०००/-
१०	पक्षी खाद्य ग्राईंडर (सिंगल फेज)	शासन + लाभार्थी	रू. १६,०००/-
		एकूण	**रू. १०,२७,५००/-**

लाभार्थीचा आर्थिक सहभाग :-

एकूण प्रकल्प किंमत रू. १०,२७,५००/- पैकी सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान म्हणजेच रू. ५,१३,७५०/- शासनाचे अनुदान देय असून, उर्वरीत ५० टक्के रक्कम लाभार्थी स्वत:चा हिस्सा किंवा वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन उभा करू शकतील.

लाभार्थी निवड :-

सर्वसाधारण, अनुसुचित जाती उपयोजना व जनजाती क्षेत्र उपयोजनेतील जे लाभार्थी सद्यस्थितीत कुक्कुटपालन व्यवसाय करत आहेत तसेच, ज्या लाभार्थ्यांकडे लघु अंडी उबवणूक यंत्र आहे, अशा लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत प्राधान्य देण्यात यावे. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना सदरचा प्रकल्प स्थापनेपासून ३ वर्ष कार्यान्वित ठेवणे बंधनकारक राहील.

लाभार्थ्यांना कुक्कुटपालन विषयक प्रशिक्षण :-

निवडलेल्या लाभार्थ्यांना कुक्कुटपालन विषयक ५ दिवसांचे प्रशिक्षण नजीकच्या सघन कुक्कुट विकास प्रकल्पांमध्ये आयोजित करण्यात यावे. यामध्ये अंड्यावरील पक्ष्यांच्या विविध जाती, त्यांचे संगोपन, निवारा, खाद्य व पाणी देण्याच्या पद्धती, खाद्याचे प्रकार, विविध रोग प्रतिबंधक लसीकरण, उबवणूकीच्या अंड्यापासून पक्ष्यांची निर्मिती, अंडी, नर पक्षी, तलंगा, एकदिवसीय पक्ष्यांची विक्री व्यवस्था, उपलब्ध बाजारपेठ इ. बाबींचा समावेश असावा. यासोबतच खाजगी अंडी उबवणुक केंद्रे / शासकीय अंडी उबवणूक केंद्रे / लघु अंडी उबवणूक यंत्राचा वापर करत असलेल्या

लाभार्थ्याच्या प्रक्षेत्रावर भेट देखील आयोजित करण्यात यावी. लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणावर होणारा खर्च प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस रू. ४५०/- याप्रमाणे आत्मा योजनेतील निकषानुसार शासनाच्या १०० टक्के अनुदानातुन भागविण्यात यावा.

योजना अंमलबजावणी अधिकारी :-

संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

योजनेंतर्गत लाभार्थी निवड :-

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे गठित करण्यात आलेल्या लाभार्थी निवड समितीमार्फत करण्यात यावी.

१)	जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त	अध्यक्ष
२)	विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (राज्यस्तर)	सदस्य
३)	प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग	सदस्य
४)	जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (राज्यस्तर)	सदस्य
५)	जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी	सदस्य
६)	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी	सदस्य
७)	सहायक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय	सदस्य सचिव

लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत प्राधान्य देण्यात यावे.

लाभार्थी प्रशिक्षण खर्च (१०० टक्के शासनाचे अनुदान)

अ.क्र.	बाब	लाभार्थी संख्या	एकूण रक्कम
१	५ दिवसांचे कुक्कुटविषयक प्रशिक्षण (प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस रू. ४५०/- प्रमाणे)	३०२	रू. ६,७९,५००/-

प्रकल्प कार्यान्वित करताना एकदाच शासनाचे अनुदान देय असून, तद्नंतर प्रकल्प सुरळीतरित्या चालू राहण्यासाठी पुढील खर्च संपूर्णपणे लाभार्थ्याने करावयाचा आहे.

राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर ३०२ सघन कुक्कुट विकास गटांची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ सर्व संबंधितांना निर्गमीत कराव्यात.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनोपचारिक संदर्भ क्र.७/१४३१ दि.७.०६.२०१७ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४१३/२०१७/व्यय-२ दि.१६.०९.२०१७ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा संकेतांक क्र. २०१७१११३१२२१४३८८०१ आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.11.13 12:27:39 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
२. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
३. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
५. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-७.
६. विभागीय आयुक्त, (सर्व).
७. जिल्हाधिकारी, सर्व संबंधित जिल्हे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व संबंधित जिल्हे
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर.
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर.
११.प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१२.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, सर्व संबंधित जिल्हे
१३.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व संबंधित जिल्हे
१४.निवड नस्ती (पदुम-४)